# दिनांक २७-०५-२०१४ रोजी वनभवन नागपूर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती, महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत

महाराष्ट्र राज्य वन कर्मचारी कल्याण निधीच्या व्यवस्थापन समितीची बैठक दिनांक २७/०५/२०१४ रोजी सह अध्यक्ष, व्यवस्थापन समिती तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदर बैठकीत खालील व्यवस्थापन समिती सदस्य/नामनिर्देशित सदस्य/केंद्रस्थ अधिकारी उपस्थीत होते.

| अ.क्र. | अधिका-यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सर्जन भगत | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा. नागपूर -अध्यक्ष |
| २ | डॉ. पी. एन. मुंडे | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), म.रा. नागपूर - सदस्य |
| ३ | श्री. यशवीर सिंह | मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन) नागपूर - सदस्य सचिव |
| ४ | श्री. सरफराज खान | मुख्य वनसंरक्षक (दक्षता व कर्मचारी कल्याण), नागपूर - कोषाध्यक्ष, कार्यकारी समिती |

## व्यवस्थापन समितीवर नामनिर्देशित सदस्य

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचा-यांचे नांव | पदनाम | वनवृत्त |
|---|---|---|---|
| १ | श्री. एस. डी. अत्रे | प्रशासकीय अधिकारी, | नागपूर वनवृत्त |
| २ | श्री. ए. के. पथे | सहाय्यक वनसंरक्षक | प्र.मु.व.सं. यांचे कार्यालय |
| ३ | श्री. एन. एस. गरूड | मुख्य लेखापाल | नाशिक वनवृत्त |
| ४ | श्री. डी.एन. सुर्यवंशी | वनपाल | ठाणे वनवृत्त |
| ५ | श्री. एस. ओ. बोरेकर | वनरक्षक | यवतमाळ वनवृत्त |
| ६ | श्री. गजानन घोडकी | शिपाई | औरंगाबाद वनवृत्त |

## नाम निर्देशित केंद्रस्थ अधिकारी

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पदनाम | वनवृत्त |
|---|---|---|---|
| १ | श्री. पी. डी. मसराम | विभागीय वन अधिकारी (दक्षता) | नागपूर वनवृत्त |
| २ | श्री. आय. टी. धाबेकर | विभागीय वन अधिकारी (दक्षता) | चंद्रपूर वनवृत्त |
| ३ | श्री. बी. एच. पाटील | विभागीय वन अधिकारी (योजना) | गडचिरोली वनवृत्त |
| ४ | श्री व्ही. टी.घुले | विभागीय वन अधिकारी (योजना) | अमरावती वनवृत्त |
| ५ | श्री. डी. पी. निकम | विभागीय वन अधिकारी (योजना) | यवतमाळ वनवृत्त |

## इतर प्रतिनिधी

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पदनाम | वनवृत्त |
|---|---|---|---|
| १ | श्री जे. एस. आगलावे, प्रशासकीय अधिकारी | विभागीय वन अधिकारी (योजना) यांचे वतीने | पूणे वनवृत्त |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्री. एस. एल. दोंदे, मुख्य लेखापाल | विभागीय वन अधिकारी (योजना) यांचे वतीने | ठाणे वनवृत्त |
| ३ | श्री जे. एन. चव्हाण, मुख्य लेखापाल | | यवतमाळ वनवृत्त |

२.०. सर्वप्रथम सदस्य सचिवांनी सदर बैठकीस उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्षांचे परवानगीने पदसिध्द सदस्य सचिव यांनी सन २०१३-१४ या वर्षासाठी वार्षिक अहवाल सादर केले. सन २०१३-१४ मध्ये एकुण १७७५९ सभासद झाले बाबत माहिती दिली तसेच सदर योजना कार्यान्वयीत झाल्यापासून मृत सभासदांचे कुटुंबियांना तसेच सभासदांचे पाल्यांना देण्यात येणा-या व दिलेल्या फायदयांबाबतची माहिती विषद केली.

२.१. महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधी योजना स्थापित झाल्यापासून आजपावेतो अपघाती मृत्यू प्रकरणी एकुण ४९ मृत सभासदांचे कुटूंबियांना विमा रक्कम रुपये १.९२ कोटी अदा करण्यात आली आहे.

२.२. <u>अपघाती ईजा</u> **:-** सभासदांना अपघातात कायमचे अपंगत्व आल्यास विमा राशी अदा करण्यात येते. तथापी आजपावेतो अपघाती ईजा प्रकरणांचे कोणतेही दावे प्राप्त झाले नाहीत.

२.३. <u>आर्थिक सहाय्य</u> :- सभासदांचा नैसर्गिक/अपघाती मृत्यू झाल्यास त्यांचे कुटूंबियांना मोफत सहाय्य रूपये २५,०००/- देण्यात येते. सदर योजना सूरू झालेपासून आजपावेतो १७१ मृत सभासदांचे वारसदारांना या योजनेचा लाभ देण्यात आला असून एकुण रूपये ५६.०० लक्ष अदा करण्यात आले आहे.

२.४. <u>शिष्यवृत्ती</u> :- गट `क` व गट `ड` संवर्गातील सभासद कर्मचा-यांचा अचानक मृत्यू झाल्यास त्यांचे दोन अपत्यांसाठी इयत्त्या १२ वी पर्यंतचे शिक्षणासाठी प्रत्येकी रू.२००/- प्रतीमाह शिष्यवृत्ती देण्यात येते. सदर योजना सुरू झाल्यापासून आजपावेतो ०१ मृत सभासदाचे ०२ पाल्यांना रूपये १०,०००/- अदा करण्यात आले आहे.

२.५. <u>प्रोत्साहनात्मक बक्षिस</u> :- गट `अ` ते गट `ड` संवर्गातील सभासद अधिकारी/कर्मचा-यांचे पाल्य १० वी व १२ वी बोर्डाच्या परिक्षेत उत्तीर्ण झाल्यास खाली नमुद केलेल्या टक्केवारीनुसार प्रोत्साहनात्मक बक्षिस देण्यात येते. सदर योजना सुरू झाल्यापासून आजपावेतो ३८ सभासदांचे पाल्यांना रूपये १.५१/- लक्ष अदा करण्यात आले आहे.

| टक्केवारी | बक्षिस रक्कम |
|---|---|
| १) ९०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण. | रू.५,०००/- |
| २) ९५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण. | रू.१०,०००/- |

२.६. <u>पुस्तकीय अनुदान</u> :- गट `क` व गट `ड` संवर्गातील सभासद कर्मचा-यांचे पाल्यांना इयत्या ८ वी पासून ८० % किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाल्यास पुस्तकीय अनुदान देण्यात येते. सदर योजना सुरू झाल्यापासून आजपावेतो ०१ सभासदाचे पाल्यास रूपये ३००/- अदा करण्यात आले आहे.

२.७. <u>वैद्यकीय कर्ज</u>. सभासदांचे तसेच त्यांचे कुंटुंबियांचे वैद्यकीय उपचाराकरीता रुपये १०,०००/- चे मर्यादेपर्यंत वैद्यकीय कर्ज मंजूर करण्यात येते. विभागीय समिती कडून ०३ सभासदांचे प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाले. त्यावर या कार्यालयाव्दारे त्यांचे विभागीय स्तरावर रक्कम अदा करण्याच्या सूचना दिल्या.

२.८. <u>महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधीची माहिती प्रकाशित करणे.</u> वन व सामाजिक वनीकरण विभागातील प्रत्येक अधिकारी/ कर्मचारी जसे शिपाई, लिपीक, लेखापाल, मुख्य लेखापाल, वनमजूर, वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल, इत्यादी सर्व संवर्गातील प्रत्येक व्यक्तिंना वनकल्याण निधीचा लाभ कशाप्रकारे मिळतात याची माहिती असावी या दृष्टीने महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधीची माहिती वन विभागाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली आहे.

३.०० सदर बैठकीमध्ये नव्याने आलेले खालील विषयावर चर्चा करण्यात आली .

| विषय क्रमांक | संक्षिप्त विषय | झालेली चर्चा व त्या अनुषंगाने घेण्यात आलेला निर्णय | कार्यवाही कोणी करायची |
|---|---|---|---|
| ३.१ | सन २०१४-१५ वर्षाकरीता विमा कंपनीची निवड करणे बाबत | सदस्य सचिवांनी असे अवगत केले की, सन २०१४-२०१५ या वर्षा करीता वन कल्याण निधीचे सभासदांचा दिनांक ११/०८/२०१४ पासून १०/०८/२०१५ पर्यंत एक वर्षाकरीता विमा काढायचा असल्यामुळे एकुण ११ विमा कंपन्यांकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यापैकी ३ विमा कंपन्यांकडून (दि. ओरीएन्टल इन्श्योरेंस कंपनी, नॅशनल इन्श्योरेंस कंपनी व न्यू इंडिया एश्यूरेंस कंपनी). दरपत्रक प्राप्त झाले. असुन त्यांचे दरपत्रकांचा तुलनात्मक तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, नॅशनल इन्श्योरेंस कंपनी यांचे दरपत्रक कंडीशनल आहे. न्यू इंडिया एश्यूरेंस कंपनी यांनी दरपत्रकात नमूद केलेले दर हे दि. ओरीएन्टल इन्श्योरेंस कंपनी नागपूर यांनी नमूद केलेल्या दरांपेक्षा जास्त आहे. तर दि. ओरीएन्टल इन्श्योरेंस कंपनी यांनी नमूद केलेले दर १०,००० व १५००० सभासदांकरीता रुपये ३०५/- प्रती सभासद व २०,००० सभासदांकरीता रुपये २८४/- प्रती सभासद हे न्यू इंडिया एश्यूरेंस कंपनी यांनी नमूद केलेल्या दरांच्या तुलनेत कमी आहे त्यामुळे ते मंजूर करण्यास हरकत नसावी. सन २००७-०८ ते सन २०१३-१४ पर्यंत (सन २०११-१२ वगळता) ६ वर्षाच्या कालावधीत दि. ओरीएन्टल इन्श्योरेंस कंपनी, नागपूर यांचेकडूनच सभासदांचा विमा उतरविण्यात आला होता. मागील ६ वर्षात ओरीएन्टल इन्श्योरेंस कंपनी नागपूर यांनी दिलेली सेवा समाधानकारक होती. म्हणून **दि ओरीएन्टल इन्श्योरेंस कंपनी नागपूर यांचे दराला मान्यता देणेबाबत सदर प्रस्ताव व्यवस्थापन समितीची मंजूरीस्तव सादर करण्यात आले. त्यास व्यवस्थापन समितीने मान्यता प्रदान केली.** | कार्यकारी समिती |

| | | | |
|---|---|---|---|
| ३.२ | सन २०१४-१५ या वर्षासाठी सभासदांकडून स्विकारायचे वर्गणी व विमा शुल्क निश्चित करणे. | सदस्य सचिवांनी असे अवगत केले की, शासन निर्णय दिनांक ०९/०८/२००६ नुसार वर्ष २००६-०७ नंतर सभासद वर्गणी निश्चित करण्याचा अधिकार व्यवस्थापन समितीला आहे. मागील वर्षी सर्व सभासदांकडून सभासद शुल्क रूपये १९५/- + विमा शुल्क रूपये ३०५/- असे एकुण रूपये ५००/- वसूल करण्यात आले आहे. या वर्षी देखील विमा कंपनींकडून प्राप्त झालेले दरपत्रकांमध्ये सर्वात कमी विमा प्रिमीयम राशी रूपये ३०५/- प्रतीसभासद ही असल्याने या वर्षी देखील सभासद शुल्क रूपये १९५/- + विमा शुल्क रूपये ३०५/- असे एकुण रूपये ५००/- वसूल करणेबाबत प्रस्तावीत करण्यात आले. त्यास व्यवस्थापन समितीने मंजूरी प्रदान केली. | कार्यकारी समिती / विभागीय समिती (सर्व) |
| ३.३ | ज्या सभासदांचा अपघाती मृत्यू झाला परंतु विमाअभावी त्यांचे कुटुंबियांना विमा राशी मिळू शकली नाही अश्या सभासदांचे कुटुंबियांना एक विशेष बाब म्हणून आर्थिक सहाय्य मंजूर करणेबाबत | सदस्य सचिवांनी असे अवगत केले की खाली नमूद सभासदांचा अपघाती मृत्यू झाला आहे.<br><br>१. उपवनसंरक्षक, मध्य चांदा वनविभाग यांचे कार्यालयातील रोहीदास गणपत देवकते, वनरक्षक यांचा दिनांक १३/११/२०१३ रोजी अपघातात मृत्यू झालेला आहे. सदर कर्मचारी हे सन २०१३-१४ या वर्षात वनकल्याण निधीचे सभासद होते. त्यांनी सभासद व विमा शुल्काची रक्कम सबंधित विभागीय समितीकडे वेळीच जमा केली होती. परंतु उपवनसंरक्षक, मध्य चांदा यांनी या कार्यालयास त्यांचा सभासद क्रमांक वेळीच सादर न केल्यामुळे व त्यांचा विमा काढणेआधीच त्यांचा अपघाती मृत्यू झाला. त्यामुळे त्यांचे वारसदारास विमा कंपनीकडून विमा राशी उपलब्ध करून देणे शक्य नाही.<br><br>२. उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग यांचे कार्यालयातील मंगल हरिभाऊ देवगडे, वनपाल यांचा दिनांक ०५/११/२०१३ रोजी अपघातात मृत्यू झालेला आहे. सदर कर्मचारी हे सन २०१३-१४ या वर्षात वनकल्याण निधीचे सभासद होते. त्यांनी सभासद व विमा शुल्काची रक्कम सबंधित विभागीय समितीकडे वेळीच जमा केली होती. परंतु उपवनसंरक्षक, आलापल्ली यांनी या कार्यालयास सभासदांची यादी वेळीच सादर न केल्यामुळे व त्यांचा विमा काढणेआधीच त्यांचा अपघाती मृत्यू झाला. त्यामुळे त्यांचे वारसदारास विमा कंपनीकडून विमा राशी उपलब्ध करून देणे शक्य नाही. | <br><br>उप वनसंरक्षक, मध्य चांदा<br><br>उप वनसंरक्षक, आलापल्ली |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३. उपवनसंरक्षक, यवतमाळ वनविभाग, यवतमाळ यांचे कार्यालयात कार्यरत असलेल्या श्रीमती. सुमन देवराव कोरडे, वनमजूर यांचा दिनांक १२/०१/२०१० रोजी अपघाती मृत्यू झाला. श्रीमती. सुमन देवराव कोरडे, वनमजूर यांनी सन २००९-१० या वर्षासाठी सभासद व विमा शुल्काचा भरणा केला होता. परंतु उपवनसंरक्षक, यवतमाळ यांनी सभासदांची यादी या कार्यालयास सादर न केल्यामुळे त्यांचा सन २००९-१० या वर्षात विमा काढण्यात आला नाही. त्यामुळे त्यांचे वारसदारास विमा कंपनीकडून विमा राशी उपलब्ध करून देणे शक्य नाही.<br>सदस्य सचिवांनी सभेत उपस्थितांना अवगत केले की, अश्याच प्रकारचे प्रकरणांमध्ये वन कल्याण निधी योजना कार्यान्वयीत झाल्यापासून आजपावेतो अपघाती मृत्यू झालेल्या परंतु ज्या सभासदांचा विमा नसलेल्या ०६ मृत सभासदांचे वारसदारांना एक विषेश बाब म्हणून आर्थिक सहाय्य प्रत्येकी रूपये ४.०० लक्ष मंजूर करण्यात आले आहे. तरी आधी प्रमाणेच सदर प्रकरणांमध्ये देखिल मृत सभासदांचे कुटुंबाकडे सहानुभूती दाखवून नमूद तीन्ही मृत सभासदांचे वारसदारांना एक विशेष बाब म्हणून आर्थिक सहाय्य प्रत्येकी रूपये ४.०० लक्ष मंजूर करण्यात यावे.<br>यावर सभेत असा निर्णय घेण्यात आला की, वर नमूद तिन्ही मृत सभासदांचे वारसदारांना सहानुभूती म्हणून एक विशेष बाब म्हणून आर्थिक सहाय्य प्रत्येकी रूपये ४.०० लक्ष देण्यास मंजूरी दिली. तथापी सदर मृत सभासदांचा विमा न होण्यास जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचा-यावर जबाबदारी निश्चित करून त्यांचे विरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ अंतर्गत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. | उप वनसंरक्षक, यवतमाळ |
| ३.४ | आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेणा-या खेळाडूला प्रोत्साहनात्मक बक्षिस देणेबाबत | सदस्य सचिवांनी असे अवगत केले की, उपवनसंरक्षक नागपूर यांचे विभागीय समितीतील श्री. सुनिल फकीरचंद फुलझेले, वनरक्षक यांनी नवी दिल्ली येथे दिनांक २८ व २९ मार्च २०१४ रोजी आयोजित झालेल्या आंतरराष्ट्रीय पॉवरलीफ्टींग स्पर्धेत व्दितीय स्थान पटकावले आहे. सदर कर्मचारी हा वनकल्याण निधीचा सन २०१३-१४ मध्ये सभासद आहे. तरी सदर सभासदास एक विशेष बाब म्हणून प्रोत्साहनात्मक बक्षिस रूपये १०,०००/- देणेबाबतचा प्रस्ताव समितीपुढे मंजूरीस्तव सादर केला. यावर समितीने सहमती दर्शवून प्रस्तावास मंजूरी दिली. | कार्यकारी समिती |

| | | | |
|---|---|---|---|
| ३.५ | वनकल्याण निधीचे काम हाताळणारे कर्मचा-यास मानधन देणेबाबत. | सदस्य तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) यांनी सूचविले की वनवृत्त/वन विभाग स्तरावर वन कल्याण निधीचे काम सुरळीतपणे चालावे या दृष्टीने वनवृत्त/वन विभाग स्तरावर वन कल्याण निधीचे काम हाताळणारे कर्मचा-यास मानधन देण्यात यावे. यावर समितीने असा निर्णय घेतला की, ज्या विभागीय समितीत ८० % किंवा त्यापेक्षा अधिक सभासद असतील त्या विभागीय समितीत वन कल्याण निधीचे काम हाताळणा-या कर्मचा-यास त्या वर्षात प्रतिमाह रूपये २५०/- मानधन स्वरूपात अदा करण्यात येईल. तसेच ज्या विभागीय समितीत सभासद संख्या १०० % असेल त्या विभागीय समितीत काम हाताळणा-या कर्मचा-यास वर्षातुन एकदाच कार्यकारी समिती, प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर यांचे कार्यालयाकडून रूपये ५००/- अतिरीक्त प्रोत्साहनात्मक बक्षिस व प्रशस्ती पत्र देण्यात येईल. परंतु ज्या विभागीय समितीत ८० % पेक्षा कमी सभासद राहतील त्या विभागीय समितीत काम हाताळणा-या कर्मचा-यास कोणत्याही प्रकारचे मानधन देण्यात येणार नाही. | कार्यकारी समिती/ विभागीय समिती (सर्व) |
| ३.६ | सन २०१४-१५ या वर्षासाठी सभासद संख्येत वाढ करणेबाबत. | अध्यक्षांनी सभेत उपस्थितांना अवगत केले की, सन २०१४-१५ या वर्षाकरीता किमान सभासद संख्या २०,००० पर्यंत वाढविण्याचे उद्दीष्ट आहे. याबाबत सर्व वृत्त नियंत्रक अधिकारी/विभाग प्रमुखांनी नोंद घ्यावी. अध्यक्ष विभागीय समिती (सर्व) यांनी त्यांचे वनवृत्त/वन विभागात कार्यरत असलेले सर्व अधिकारी/कर्मचा-यांकडून माहे मे २०१४ च्या माहे जून २०१४ मध्ये देय होणा-या वेतनातुन सभासद व विमा शुल्क कपात करून कमीतकमी ९०% चे उद्दीष्ट साध्य करावे. महोदयांनी अश्याही सूचना दिल्या की, सर्व विभागीय समितींना कार्यकारी समितीकडे रक्कम RTGS/NEFT व्दारे स्थानांतरीत करण्याच्या सूचना दिल्या असतांनाही काही विभागीय समिती धनादेश/धनाकर्षाव्दारे रक्कम कार्यकारी समितीकडे पाठवित आहेत. तसेच काही विभागीय समितींमध्ये वनक्षेत्रपाल कार्यालयाकडून परस्पर कार्यकारी समितीकडे सभासदांचे अर्ज/यादया तसेच रक्कम पाठविली जात आहे. त्यामुळे विभागीय समितीस्तरावर याचा हीशोब राहत नाही. तरी वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी या कार्यालयास सभासदांची यादी/अर्ज व रक्कम परस्पर पाठविली असल्यास त्याची प्रत संबंधित विभागीय | कार्यकारी समिती/ विभागीय समिती (सर्व) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | समितीस देणे बंधनकारक राहील व रक्कम तसेच यादी/अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले किंवा नाही व त्याची प्रत विभागीय समितीस प्राप्त झाली किंवा नाही याची त्यांनी खात्री करून घ्यावी. तसेच काही विभागीय समितींकडून रक्कम कार्यकारी समितीच्या खात्यात स्थानांतरीत केली जाते तथापी ज्या सभासदांची रक्कम स्थानांतरीत केली आहे त्या सभासदांची यादी कार्यकारी समितीकडे पाठविली जात नाही अश्या परिस्थीतीत सभासदांचा विमा काढणे शक्य नाही. सर्व विभागीय समितींनी सभासदांचे अर्ज/यादया व स्थानांतरीत केलेल्या रक्कमेचा तपशिल एकमुस्ततेने कार्यकारी समितीकडे सादर करणे आवश्यक आहे.<br><br>अध्यक्षांनी अश्या सूचना दिल्या की, काही वनवृत्त/ विभागीय स्तरावर/वनक्षेत्रपाल स्तरावर वनकल्याण निधी योजनेकडे पाहीजेतेवढे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे खालचे स्तरावर कर्मचा-यांना या योजनेची माहिती होत नाही व त्यामुळे काही वनविभागांची सभासद संख्या फारच कमी आहे. मागील वर्षात वन व सामाजिक वनीकरण विभागात ५४४० रोजंदारी मजूरांना कायम करण्यात आले आहे. त्यामुळे सन २०१४-१५ या वर्षाकरीता किमान सभासद संख्या २०,००० (वीस हजार) होणे अपेक्षित आहे. सदर वर्षी ज्या वनविभागाची सभासद संख्या ९० टक्के पेक्षा कमी राहील तसेच वन कल्याण निधी योजने संबंधी काम असमाधानकारक राहील त्या वनविभागातील संबंधित अधिका-यांच्या वार्षिक गोपनीय अहवालात यांची नोंद घेण्यात येईल. | |
| ३.७ | महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधीची माहिती प्रकाशित करणे. | अध्यक्षांनी सूचना दिल्या की, वन व सामाजिक वनीकरण विभागातील प्रत्येक अधिकारी/ कर्मचारी जसे शिपाई, लिपीक, लेखापाल, मुख्य लेखापाल, वनमजूर, वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल, इत्यादी सर्व संवर्गातील प्रत्येक व्यक्तिंना वनकल्याण निधीचा लाभ कशाप्रकारे मिळतात याची माहिती असावी या दृष्टीने महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधीचे ३०,००० माहिती पत्रक मुद्रांकीत करून सर्व वनवृत्त/वनविभागांना वितरीत करावे. तसेच वनवृत्त/ वनविभागातील संबंधित अधिकारी/ कर्मचारी सदर माहिती पत्रक त्यांचे विभागीय समितीत कार्यरत असलेले सर्व अधिकारी/कर्मचा-यांना वितरीत करतील जेणेकरून प्रत्येक अधिकारी/कर्मचा-यास या योजनेबाबत माहिती मिळू शकेल. माहिती पत्रक तयार करण्याची जबाबदारी श्री. पी. डी. मसराम, विभागीय वन अधिकारी (दक्षता), नागपूर वनवृत्त यांना सोपविण्यात आली आहे. | कार्यकारी समिती/ विभागीय समिती (सर्व) |

| | | | |
|---|---|---|---|
| ३.८ | लेखा परिक्षण करणेबाबत | अध्यक्षांनी सूचना दिल्या की, बहूताश वनवृत्तांनी २००६-०७ ते सन २०१३-१४ या कालाधीपर्यंतचे लेखापरिक्षणाचे काम अद्याप पूर्ण केलेले नाही. तरी सर्व वृत्त नियंत्रक अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात कार्यरत असलेले प्रशासकीय अधिकारी/कार्यालय अधिक्षक यांचेमार्फत त्यांचे तसेच त्यांचे अधिनस्त असेल्या विभागीय समितीचे सन २००६-०७ ते २०१३-१४ या कालावधीचे लेखा परिक्षण दिनांक ३०/०६/२०१४ पर्यंत पूर्ण करून लेखा परिक्षण अहवाल कार्यकारी समितीस दिनांक १५/०७/२०१४ पर्यंत न चूकता सादर करावा. | कार्यकारी समिती/वृत्त नियंत्रक अधिकारी (सर्व) |
| ३.९ | निधीचे बळकटीकरण करणे | सदस्य तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) यांनी सूचना दिल्या की, दिनांक ०९/०८/२००६ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या नियमांच्या अधिन राहून निधीचे बळकटीकरण करण्याकरीता वृत्त स्तरावर सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करावे. | वृत्त नियंत्रक अधिकारी (सर्व) |

सभेअंती सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहिर केले.

स्वा/-xxxxxxx
सह अध्यक्ष, व्यवस्थापन समिती
महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधी
तथा
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

का.प्र. मा. प्र.मु.व.सं. (व.ब.प्र.) म.रा. नागपूर
यांचेकडून अनुमोदीत

सह अध्यक्ष, व्यवस्थापन समिती
महाराष्ट्र राज्य वनकर्मचारी कल्याण निधी
तथा
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
महाराष्ट्र राज्य, नागपूर/करीता